# प्रभुतरुण


| वर्ष ५० | अंक १ | मुंबई | जुलै, २०१६ | पाने ६ | किंमत रु. १ |
|---|---|---|---|---|---|

( *स्थापना* : तारीख २५ ऑगस्ट १९२३ )


**तत्त्वाचा बंदा जीव । मूर्तीला कोण विचारी?**


**www.prabhutarun.org**

*संपादिका:* **सुहासिनी कीर्तिकर** *कार्यकारी संपादक मंडळ* : **मिनाक्षी जयकर, मयुरा नायक, संजना कोठारे, वैजयंती कीर्तिकर**

*सहाय्यक संपादक:* **त्वरिता दळवी, राजेश नवलकर, भक्ती शेटचे**


*संपादकीय*

## ‘सुनील’ चरित्रे

**—सुहासिनी कीर्तिकर**

डॉ. सुनील राणे परवा परवाच गेल्या. इथून तिथून मला सकाळपासून तीन चार फोन आले आणि ऐकू नये वाटत असणारी, खरी असू नये वाटत असणारी ती कटू बातमी सकाळचा ताजेपणा नासवत राहिली. कारण डॉ. सुनीलचं असणं म्हणजेच प्रसन्न सकाळ! सुनीलचं सौहार्दपूर्ण वागणं म्हणजे टवटवीत ताजेपणा! पण ते एका क्षणी कुणाच्याही इच्छेला न जुमानता अखेर संपतंच. तसं ते त्या दिवशी संपलं. मी डॉ. सुनीलच्या अंतीम दर्शनासाठी, डॉ. अनिताच्या सांत्वनासाठी ‘वेळेवर’ गेले. अशी ‘वेळ’ तशी अवघडच. कुणाच्याही बाबतीत. डॉ. सुनील शांत झोपल्यासारख्या पडल्या होत्या. त्यांच्या चेहऱ्याला आत्मीय हातांनी पावडर कुंकू केलं होतं. हो! अन् डोळ्यांवर चष्माही होता! त्या चष्म्याआडची नेहमीची स्निग्ध नजर पापणबंद होती. मग उगाच आठवून गेल्या गणेश मरकड यांच्या ओळी...

‘‘मोक्ष कुणी पाहिलाय
पण जगण्याच्या अंतिम क्षणी
तृप्तीची फुलपाखरं
डोळ्यात बागडताना दिसतील
माणूस बनल्यास’

ती ‘तृप्तीची फुलपाखरं’ मला त्या बंद डोळ्यात खरोखरच बागडताना जाणवली हो! कारण डॉ. सुनील अरविंद राणे ह्या खऱ्या अर्थानं ‘माणूस’ होत्या.

म्हणूनच त्या ‘प्रभु प्रभात’च्या कार्यकारी संपादिका होत्या; तरीही माझा लेख आवडला ‘तरुणा’ तला की न चुकता मला फोन करायच्याच. त्या लेखासंदर्भात आपल्या अंतरीचं गूज माझ्याशी वाटून घ्यायच्या. माझ्या इतर कार्याबद्दलही त्यांना आस्था होती. फोन करून कौतुकाची माझ्यावर त्या कधी कधी तर बरसातच करायच्या. यामागचं ठळक कारण म्हणजे त्यांच्या हाडीमाशी खिळलेला सुसंस्कृतपणा! शिक्षणाबद्दल कळकळ. कामामधली अंतरीची आस. माणसांचे वेड. माणुसकीचा त्यांनी घेतलेला वसा. त्या गेल्या त्या दिवशी ही बातमी आणखीही कुणी सांगावी माहीत्येय? तर झावबावाडीच्या नाक्यावरच्या पेपर स्टॉल चालविणाऱ्याने. तो म्हणाला, ‘अहो, धसवाडीतल्या राणेआजी गेल्या! अगदी लाख बाई!’ माणुसकीचा वसा ज्यानं घेतलाय त्यांच्याच वाट्याला इतरांचे असे हळहळणे येते. म्हणजे अगदी खरेखुरे काळजापासूनचे.

मला आठवतंय, त्यांच्या ‘साठी’ निमित्ताने (कै.) विहंग नायक आणि मी ‘भल्या पहाटे’ सहा वाजता त्यांच्या घरी पुष्पगुच्छ घेऊन गेलो होतो. त्यांच्यावरच श्री. विहंगनी मला वाटते, लेख लिहिला होता शुभेच्छा देणारा. पण तो प्रकाशित होणार नियमाप्रमाणे सोळा तारखेला. मला विहंग म्हणाले, ‘तुमच्याकडे प्रुफ तपासणीसाठी कॉपी आलीय नं, तीच त्यांना आपण देऊ. ताजेपणा महत्त्वाचा.’ मी ती कच्ची प्रत बरोबर घेतली होती. मग त्या लेखाचे त्यांच्यासमोर वाचन झाले. त्या म्हणाल्या होत्या, ‘माझ्या वाढदिवसाच्या सकाळी सकाळी किती सुंदर भेट ही. आय ॲम ग्रेटफूल टू यू.’ ही आठवण आज त्यांच्यावर लिहिताना जागी झाली. आच लागल्यावर पाण्यातला तळीचा बुडबुडा अलगद वर यावा नं, तशी ही तरंगत आलेली आठवण! त्या ‘साठी’ नंतर अनेक पावसाळे आले, गेले. (विहंगही गेले!) पण डॉ. सुनील या पावसाळ्यांबरोबर खऱ्या अर्थाने वाढत राहिल्या. समृद्ध झाल्या. ‘थांबला तो संपला’ हे त्यांना आतून आतून आकळले होते ना! म्हणूनच त्या लेकींच्या शिक्षणातील प्रगतीबरोबरीनेच स्वत: चालत राहिल्या. मुलींच्या डॉक्टरेट

(पान २ कॉलम १ वर)

*विस्तारीत संपादकीय*

## The Overflowing Wardrobe

**-वैजयंती कीर्तिकर**

My cupboard has always been overflowing and yet, I never have anything to wear! Have you ever experienced that? Now that is a silly question to ask. We women are always in the dilemma of having nothing to wear. If we find a shirt that we like, we will buy two more in different colors. Shoes have started taking over the wardrobe.

Whenever I pull open the wardrobe, the clothes simply crash out on the floor in a heap (I am not the neat and tidy kind!) giving a sign of plenty. However, as I start digging through the pile of clothes, I often find myself asking ‘why don’t all my clothes fit me?’

I remember shopping at a store once, trying on different outfits and was quite unsure of which looked best and which to buy. Though hubbyji was along with me, we women generally don’t trust the fashion acumen of this species. There was this elderly gentleman who took upon himself to give me the thumbs up and thumbs down sign for every change of outfit. He was also very vocal when he particularly liked any piece of clothing. He was there with his wife and granddaughter. The granddaughter was trying on some clothes for her school party. She chose couple of outfits and was insisting on buying all three. He was very stern and clear that they were going to buy only one. As the young one and the old one argued about this, he felt he had to justify his stand to us; less we take him to be a miser. He told us that it was important to teach the younger generation the concept of happiness in minimalistic living. This struck a chord somewhere.

Doing the rounds currently on the internet, are blogs where people have shared how they have mastered the art of living with less and having a Zen closet. Zen is a way of being. Zen is nothing but feeling peaceful and relaxed. The dictionary describes Zen as a total state of focus that incorporates a total togetherness of body and mind. Zen closet is having only 3-4 pairs of clothes hanging in the closet and these should last you for the next 3-4 months. Supposedly, this helps in setting the mood for the day. Instead of opening the closet doors to chaos and trying to decide what to wear, getting dressed now is a breeze. Your mornings aren’t consumed with which skirt to wear or shoes to slip on. Time is saved which can now be utilized for things that really matter.

This led me to trying to imagine how life would be when I next open my wardrobe doors and nothing comes flying out at me. There I see couple of clothes neatly hanging in there. I now have to choose what to wear. This is the moment of liberation; I am supposed to be feeling peaceful, happy, and relaxed. The opposite happens, panic sets in! The mood of the day is set – depression! Selecting from the 4 pair of clothes is a nightmare. The mind does not feel liberated, it feels numb. Imagine wearing the same stuff for 3-4 months, it will be like the sun has stopped rising.

Obviously this Zen experiment is surely not for the faint hearted like me. But this did motivate me to clean and organize my wardrobe. Now it is not a very big cupboard but it is certainly bursting at its seams. I started by sorting clothes into piles that everyone tells you to make: Keep and Discard. As simple as it sounds, this turned out to be a truly agonizing process. What to keep? What to discard? Why to discard it? Won’t this still look good on me? Can’t I fix this and fit into it somehow? Hours passed by. I felt like a crazy

(पान २ कॉलम ३ वर)

संपादकीय

(पान १ कॉलम २ वरून)

बरोबरीने त्यांनीही आपली डॉक्टरेट केली. डॉ. श्रॉफकडे मला वाटते! कारण एकदा श्रॉफ मला भेटल्या असताना काय कुणास ठाऊक; डॉ. सुनीलचा विषय निघाला. त्या म्हणाल्या, 'शी इज डेडिकेटेड!' त्यांचं हे 'डेडिकेशन' त्यांच्या शिक्षण व्यवसायात होतंच. पण त्या करीत असलेल्या समाजकार्यातही होतं.

त्या 'पाठारे प्रभू महिला समाजा'च्या विश्वस्त होत्या. समाजाच्या बहुतेक कार्यक्रमांना त्या हजेरी लावायच्या. शेवटी शेवटी वयोपरत्वे, प्रकृतीपरत्वे थकत गेल्या तशा महिला समाजाच्या बैठका त्यांच्याच घरी होऊ लागल्या. म्हणजे पहा! त्यांची उपस्थिती महिला सामाजाच्या अधिकाऱ्यांना किती आश्वासक वाटायची ती! तीच गोष्ट 'प्रभु प्रभात'चीही. 'प्रभात'च्या त्या कार्यकारी संपादिका. त्या मासिकाच्या कार्यात आणि इतरही गोष्टीत त्या (कै.) प्रमोद नवलकरांच्या कुटुंबीयच होऊन गेल्या होत्या. म्हणूनच 'प्रभात'च्या संपादिका वंदना नवलकर यांनी शेवटच्या निरोपात त्यांच्यामधल्या चाळीस वर्षांच्या मैत्रीचा उल्लेख सार्थपणे केला. मैत्री म्हणजे सुखदुःखात सहभागी होणं. 'प्रभु प्रभात'ची अधिकृत जबाबदारी पार पाडताना डॉ. सुनील यांनी मनापासून आपला सहभाग नोंदवला. त्यामुळे 'प्रभु प्रभात'च्या बैठकाही डॉ. सुनील यांच्याच घरी होत असत. गेल्या महिन्याच्या पंचवीस तारखेला अशी बैठक त्यांच्याच घरी झाली होती. अन् आता....?

'प्रभु प्रभात' मधली काही संपादकीये कार्यकारी संपादक या नात्यानं डॉ. सुनील लिहीत. मनातील स्वैर विचारांना शब्दबद्ध करीत. हे विचार अलीकडे 'मृत्यू' भोवती रुंजी घालू लागले होते. त्या त्यांच्या स्वैर विचारांना ठळकपण असे. खरेतर डॉ. सुनीलची प्रसंगोचित भाषणेही अशी मोठ्या आवाजात ठासून ठळकच होत. याचं कारण, त्यामागची त्यांची ठाम भूमिका आणि तळमळ.

डॉ. अरविंद आणि डॉ. सुनील हे दोघेही कार्यतत्पर, सुसंस्कृत, शिक्षणप्रेमी. डॉ. सुनील शरीराच्या आकारमानाने तशा स्थूलच. पण मनोवृत्ती, कार्यतत्परता ही 'स्थूलातून सूक्ष्माकडे' जाणारीच अशी गुणसंपन्न. आपण साधारण माणसंही आपला विकास साधण्यासाठी अशीच 'स्थूलातून सूक्ष्माकडे' जाण्याची धडपड करतो. सुनीलताई याचं साक्षात उदाहरणच होतं. म्हणूनच डॉ. अरविंद यांच्या जाण्यानंतर सुनीलताई तशा एकाकी झाल्या तरी एकट्या पडल्या नाहीत. त्यांनी माणसं कमावली. लेक-जावयांशी घट्ट मैत्री केली. त्यांच्या इतर लेकी परदेशात स्थिरावल्या आहेत; पण डॉ. अनिता सुनील कोठारे या रोजच्या रोज कॉलेजला जाता जाता आईला एक धावती भेट देत. तिचं सारं हवं-नको पाहत. त्यांनीच आपल्या आईला शेवटचा निरोपाग्नी दिला. आपले पतिराज सुनील यांच्या सहकार्याने हे त्यांनी समर्थपणे केलं. हीच सुनीलताईंची पुण्याई! याच शेवटच्या संस्कारापूर्वी डॉ. अनिता यांनी परदेशातून आलेला बहिणीचा संदेश वाचून दाखवला. भावोत्कटपणे 'द मदर' ही कविता म्हटली. 'यू गेव्ह एव्हरीथिंग टू मी' मधील शब्द केवळ शब्द नव्हतेच. ती अनिताची हृदयस्थ खरीखुरी भावना होती. याच भावनेपोटी डॉ. सुनील यांची अंतीम यात्रा फटाक्यांच्या आवाजात सुरू झाली. सुखास्ते पंथान:।

डॉ. सुनील यांनी रेकी उपचाराचेही शिक्षण घेऊन तंत्र अवगत केले होते. मानवकल्याणासाठी याही शिक्षणाचा त्यांनी उपयोग केला होता. या त्यांच्या सर्व कार्याचे फलित म्हणजे त्यांना दिलेला भावपूर्ण निरोप. निरोप दिला तरी ती व्यक्ती आपल्या मनातून कशी संपणार? कशी पुसली जाणार?

म्हणतात ना, (म्हणजे भागवतात एकनाथांनीच म्हटले आहे!...) सगुण चरित्रे परमपवित्रे सादर ऐकावी। तसे डॉ. सुनील यांचे हे चरित्र आहे. सादर ऐकण्याजोगं. मनात साठवण्याजोगं.

'सगुणचरित्रे' म्हणण्यापेक्षा इथे 'सुनील चरित्रे' म्हटलं तर ते अधिक योग्य होईल ना?

या 'सुनील चरित्रा' बद्दल आदरभाव ठेवून इतकेच म्हणते की त्यांचा स्थूलातून सूक्ष्माकडे झालेला प्रवास सुखदायी, लाभदायी, पोषक व्हावा!

✳

## प्रतिक्रिया

२७ जून २०१६

प्रिय सुहासिनी,

नुकताच जूनचा प्रभूतरुण हाती आला. तुमचं संपादकीय 'कचरेमे रहने दो , कचरा ना उठाओ' फार आवडलं. त्यातलं वाक्य 'आपल्यातल्या अनेकांना मनातल्या कचऱ्यातच आपण राहात आहोत हे कळतच नाही. मग कचरामुक्तीची मोहीम आखायची कशी?' अतिशय बोधपूर्ण वाटलं, असो.

छोटा गंधर्व यांच्यावरचा लेख छापल्याबद्दल धन्यवाद. त्या संदर्भात दोन गोष्टींचा उल्लेख करायचा मोह होतो. गाणं शिकायच्या सुरवातीला मला शिवाजीपार्क जवळच्या बालमोहन शाळेत त्यांना एकदा साथ करण्याचं भाग्य लाभलं होतं. 'चांद माझा हा हासरा' 'सुखावितया संसारा' अशी अनेक गोड गाणी सतत चार तास ते गात होते. तंबोरा छेडताना माझी बोटं दुखत होती. पण त्यांच्या गोड गाण्यात मला त्याचं भान राहिलं नाही. तसंच काही वर्षांनी मी त्यांना त्यांच्या पुण्याच्या प्रभात रोडवरील घरी भेटल्यानंतर, पत्र लिहिण्यासाठी पत्ता विचारला; तेव्हा ते म्हणाले, 'छोटा गंधर्व, पुणे असं लिहा म्हणजे तुमचं पत्र मिळेल' त्याप्रमाणे मी त्यांना पत्र लिहिलं. ते पत्र त्यांना मिळालं आणि त्याचं उत्तर मी जपून ठेवलं आहे.

असा गोड नाट्यसंगीत गाणारा छोटा गंधर्व पुन्हा होणार नाही.

तुमचा,
सुजन

विस्तारित संपादकीय

(पान १ कॉलम ४ वरून)

person, like all those clothes had possessed me. I looked at the pile to discard and they were all so beautiful clothes that I may wear someday! The satan in my mind was suddenly awake. Ten minutes later, the clothes were back to where they belonged, lying in heaps, tangled with each other, rubbing against each other, fighting for breath; only to find the wardrobe door being ruthlessly closed on them. So much for the decluttering experiment!

I never realized that this failed organizing drive would lead me to deeper truths about myself. Not only the truth that the closed doors of the cupboard do not hide any true fashion behind them but also that life if not clutter for me would be just boring. It is still going to take some lifetimes for me to even understand Zen living. Mornings will never give me the same adrenaline rush if the clothes don't simply fall out in heaps.

Sometimes I do go down the guilt trip. But then I take comfort from my 18 month old daughter. Whenever we buy her a new pair of clothing or shoes, she insists on wearing the new thing the very next day. I guess, we are simply designed to perform this way. Hush…nothing wrong with me!

Some of you may be thinking does greed and narcissism get any bigger? But I know in my heart I am just being human! Just like the saying goes 'I like my money right where I can see it hanging in my closet'.

✳

# The Surrogate Mother

**- Mrs. Achala Desai**

The modern concept of surrogacy is much talked about these days. Its a new concept in India in comparison to the western world. Any social change has its own pros and cons; so does surrogation. This whole process has different perspectives - physical, emotional, financial and moral.

one woman unable to bear a child in her uterus for whatever reason, opts for another woman to carry her egg and sperm in her healthy uterus. then the other woman becomes a surrogate mother for the growing foctus. Thus the woman opting for this procedure does not go through the nine months of effort. The other woman or the surrogate mother carries the child for 9 months and delivers as per her constitution. Is she physically fit? Does she have proper nutrition? these are questions of worry.

Emotions play a big part in the development of the child in the womb. How much support does the real mother give the surrogate one emotionally? Also how much care does the surrogate mother show towards the growing foctus? or how much is she emotionally involved? The overall development depends on these emotional factors.

The financial aspect of the whole process of surrogation is very important. the real mother shells out a womb for the rent of the uterus. The surrogate mother quotes a huge sum for the same. Its a business deal. The money given can lure young girls into this business, However those in great need of money have got a good option.

Moral aspect is from both sides - the real mother and the surrogate mother.

The real mother is sometimes too stylish or self conscious to stress her body. she could be a public figure who cannot stay away from work for a year in order to deliver a baby. Is it fair to the growing foctus? The surrogate mother could be delivering one baby after another for the sake of money. What right does one have to bring into this world a child from a weak mother? Though her uterus is strong?

Surrogate mothers are a blessing to really struggling couples who long for a baby. But to make a business out of it is very immoral. Don't you think so?

लेख क्रमांक ६

## दूरदेशातून-

# धर्मांध समाज

-सुजन राणे
Sujanrane@yahoo.com


नुकतंच फ्लोरिडामध्ये एका माथेफिरू माणसाने ५० लोकांना मारलं आणि ४९ लोकांना जखमी केलं. त्यामुळे टी.व्ही व मीडियामध्ये हा मोठा चर्चेचा विषय झाला आहे. हिंदुस्थानातसुद्धा ही बातमी चांगलीच झळकली असेल यात शंका नाही. अमेरिकेतलं सरकार, इथले पुढारी व investigating agencies मारणाऱ्याचा हेतू, त्याची या बाबतीत तयारी व त्याचे आखाती देशांतले कट्टरपंथी संस्थाशी काय संबंध होते हे अगदी खोलात जावून विचार करत आहेत. तो माथेफिरू लोकांना मारताना हसत होता व स्वत:च्या बायकोला तसं कळवत होता हे आता सिद्ध झालं आहे. त्याची या बाबतीत काहीही विचारधारणा असेल; पण इतक्या निरपराधी माणसांचा जीव घेणं व दुसऱ्यांना जायबंदी करणं ही केवळ मानसिक विकृती आहे असं आपल्याला वाटणं साहजिक आहे. परंतू त्याच्या धर्मात अशा समलिंगी लोकांच्या संबंधांना स्थान नाही अशी त्याची लहानपणापासून पक्की समजूत होती. धर्म आणि समाज यातील द्वंद्व कित्तेक पिढ्या चालत आलं आहे तेव्हा त्यात नवीन असं काही नाही असं वाटणं नैसर्गिक आहे. परंतू, अगोदरच्या कित्तेक पिढ्यांना जे साधलं नव्हतं ते आपल्याला २१व्या शतकात मिळालं आहे ते म्हणजे माहिती तंत्रज्ञान (Information Technology). त्यामुळे हल्लीच्या पिढीच्या माहितीत बरीच भर पडली आहे व आता कुठल्याही प्रकारची माहिती सध्याच्या पिढीला सहज उपलब्ध होते. इंटरनेट आल्यापासून जग लहान झालं आहे म्हणजे आपण एकमेकांच्या जवळ आलो आहोत. ही परिस्थिती पूर्वी कधीही नव्हती. पण प्रश्न असा उद्भवतो की इंटरनेटचा उपयोग आपल्या ज्ञानात पटकन भर करण्यासाठी करावा की या साधनाचा दुरुपयोग करून धर्माच्या द्वारे समाजात गैरसमज पसरवावा?

पूर्वीपासून धर्माचा प्रसार किंवा धर्मात सांगितलेल्या चांगल्या गोष्टींचं अनुकरण करावं हे मंदिरातून, चर्चेसमधून, सायनॅगॉग आणि मशिदीतून धर्मगुरू सांगत आले आहेत. परंतु ती परिस्थिती बदलून आता काही धर्मगुरू अशा धार्मिकस्थानाऐवजी इंटरनेटचा गुप्त रित्या उपयोग करून तरुण पिढीला चुकीचे धडे देतात असं उघडकीस आलं आहे. ही मोठी चिंताजनक समस्या झाली आहे. ही बदलती परिस्थिती आपल्याला विचार करायला प्रवृत्त करते की शेवटी धर्माची समाजात खरी भूमिका कोणती आहे? मुळात कुठलाही धर्म माणसाला वाममार्गाकडे जायला सांगत नाही. पण माणूसच वाममार्गाकडे जाण्यासाठी धर्माचा दुरुपयोग करत असतो, हा paradox आहे. इंटरनेट हे साधन catalist आहे म्हणजे ते स्वत: तसंच राहून दुसऱ्यांना बदलत असते. त्याच्यावर गुगलसारख्या माध्यमाचा उपयोग करून आपल्याला कोणत्याही विषयाबद्दल नुसती माहिती मिळू शकते असं नाही पण त्यामुळे आपली मनोवृत्ती बदलू शकते. थोडक्यात या साधनात किती ताकद आहे हे विचार करण्यासारखं आहे, कारण ते एखाद्या समाजात आमूलाग्र बदल घडवू शकते.

धर्म, भाषा, अन्न, वस्त्र, संस्कृती व भौगोलिक प्रदेश अशा काही सामान्य घटकांमुळे माणसाचे निरनिराळे समाज निर्माण होतात हे आपल्याला माहीत आहे , परंतु त्यात धर्माचं स्थान प्रमुख आहे, कारण धर्माचा माणसाच्या बुद्धीशी संबंध आहे. धर्म म्हणजे मानसिक शिस्त अशी व्याख्या करायला हरकत नाही आणि ही शिस्त माणसाच्या उन्नतीसाठी आहे असं म्हणावं लागेल. पण एखादी शिस्त आपल्याला गैर मार्गाकडे जायला प्रवृत्त करत असेल तर ती खचितच बदलली पाहिजे. सध्या अमेरिकेत आणि युरोपमध्ये सामाजिक परिस्थिती अस्थिर असल्यामुळे त्याचा तिथल्या राजकीय वातावरणावर बराच परिणाम झाला आहे. अमेरिकेचा राष्ट्रपती निवडण्याची तीव्र चळवळ आणि ब्रिटनचं युरोपिअन युनियनचं सभासदत्व सोडणं ह्याचा या अस्थिर परिस्थितीशी संबंध आहे व त्याचं मूळ धर्माच्या कट्टरपणाकडे आहे असं काही लोकांचं म्हणणं आहे. अमेरिकेतल्या रिपब्लिकन पार्टीचे सभासद डोनाल्ड ट्रम्प राष्ट्रपती पदासाठी निवडून येण्यासाठी सध्या बेजबाबदार भाषण करतात. पण इथल्या बहुसंख्य समाजाला ती भाषणं पसंत पडतात. कारण ती इथल्या समस्यांशी निगडीत आहेत. त्याचप्रमाणे ब्रिटनच्या पंतप्रधानांना युरोपियन युनियनमध्ये रहायचं होतं पण ब्रिटीश समाज त्यांच्याशी सहमत नाही. तेव्हा ब्रिटनला युरोपियन युनियन सोडावं लागलं. याचा अर्थ लोकशाही तंत्राप्रमाणे समाज हा सर्व श्रेष्ठ आहे. धर्म किंवा संस्कृती सारख्या कल्पना लहान किंवा मोठ्या समाजामुळे होत असतात. अशावेळी प्रश्न पडतो की धर्म समाजासाठी आहे की समाज धर्मासाठी आहे? माणूस जन्माला यायच्या अगोदर धर्म अस्तित्वात नव्हता, माणसांनी स्वत:च्या कल्याणासाठी धर्माची निर्मिती केली, तेव्हा धर्म ही मनुष्यकृती आहे. ती काळानुसार समाजाच्या बदलत्या रूपाप्रमाणे बदलायला हवी. शेवटी कुठलीही कल्पना कालबाह्य किंवा न बदलणारी नसते. धर्माची पट्टी डोळ्यांवर बांधून धर्माच्या नावाखाली दुसऱ्यांवर अत्याचार करणं आणि निरपराधी लोकांचा वध करणं हे नक्कीच निषेधार्थ आहे. असा समाज धर्मान्ध आहे. तेव्हा अशा धर्मात परिवर्तन झालं पाहिजे म्हणजे त्याचे अनुयायी बदलतील अशी आशा करणं क्रमप्राप्त आहे. काहीही असो; काळाप्रमाणे कुठलाही धर्म किंवा कुठलंही तत्त्वज्ञान बदलायला हवं, कारण तशी काळाची गरज असते. काळाचं माहात्म्य आपल्याला विसरून चालणार नाही. आपल्या पूर्वजांनी 'कालाय तस्मै नम:' ही उक्ती फार विचारांती केली आहे, तेव्हा तो मार्ग माणसाच्या समाजापुढे असावा असं राहून राहून वाटते.

## प्रतिक्रिया

### माझी हसरी रेखा -कल्पना सुभाष कोठारे



''एस.एम.एस. वाचून बैलाचे अंग शहारते तसे झाले, आनंद झाला...''
प्रदीप कोठारे यांच्या लेखातील वाक्य.
प्रभुतरुण जून अंक, पृष्ठ क्रमांक ५

### हसरी रेखा -प्रदीप कोठारे



आलटून पालटून-

# अद्भुत गोष्टींचा संग्रह

विनय त्रिलोकेकर

### भूतांच्या गोष्टी
### ३. गौतमचा अनुभव

माझा भाचा गौतमचे कॉम्पुटर सर्विसिंग, इलेक्ट्रिकल रिपेरिंग, तसेच कराटे ट्रेनर व तायची ट्रेनिंगचा क्लास;असे बरेच उद्योग. तो हे सारे स्वतंत्रपणे करतो. एवढेच नव्हे तर घरातही बरेच काही सांभाळतो-

''गौतम, कुकरची शिटी कोठे आहे? बघ जरा,''आई.

''गौतम, आरुषचे हिस्ट्री बुक मला दे आणि माझे बँक बुक अपडेट करून आण'' आदिती.

''गौतम, माझ्या एफडीझची फाईल आणून दे मला आणि आज संध्याकाळचे लक्षात आहे ना? तू गाडीने आम्हाला निशामावशीकडे नेणार आहेस, बरोबर?'' संजीव.

असं त्याच्यावाचून पान हलत नाही. तो खरोखर 'Man for all seasons' आहे. असो! आपण त्याच्या अनुभवाबद्दल बोलू.

त्याला बालेवाडी, पुणे येथील एका कंपनीचे कॉम्पुटर सर्विसिंग कंत्राट नुकतेच मिळाले होते. त्या निमित्ताने तो आपला सोबती, चंद्रकांत गस्तीबरोबर तेथे गेला होता. त्यांनी वॉचमनच्या घरून कंपनीच्या चाव्या आणल्या होत्या. दोघांनी सकाळी ८ वाजताच काम सुरू केले. कंपनीचे वीस कॉम्प्युटर आणि त्यातील आठ पार खराब झाले होते. ते दुरुस्त करण्यासाठी पूर्ण दिवस लागणार होता. बरे झाले, आज रविवार असल्यामुळे कंपनीत वॉचमन सोडून कोणी नव्हते. कामात त्यांना कसलाच व कोणाचाही अडथळा नव्हता. ते निवांतपणे काम करणार होते. ते कामात रमून गेले होते. जेवण, खाण्या-पिण्याचे सोडा; पण वेळेचेदेखील भान नव्हते.

''साब लोग, कितना काम बाकी है? ५ बजे है, ७ तक अपना काम निपटा लो, ७ के बाद मैं रुकनेवाला नहीं।''

''कोशीश करते है, २ घंटे बाकी तो है।'' गौतमने वॉचमनला उत्तर दिले.

''कुछभी करो। ७ बजे मैं आपको चाबियाँ देके चला जाऊंगा। एक मिनटभी रुकुंगा नहीं, यहाँ ठेरना अच्छा नहीं लगता, डर लगता है और आप लोगभी नहीं रुको। यहाँ कुछ अच्छा नहीं होता।''

गौतम आणि चंद्रकांत कामात इतके बुडून गेले होते की वॉचमनच्या बोलण्याकडे विशेष लक्ष नव्हते. ते काम करीत राहिले. हां, हां म्हणता ७ कधी वाजले हे त्यांना कळले नाही.

''क्या साब, हुआ काम?'' गौतमने मान वर करून वॉचमनकडे बघून हातानेच नाही असे खुणावले.

''मैने बोला था। ये लो चाबियाँ, ये खोली बंद करो, उप्पर ३ मालेसे लेकर ६ तक सब दरवाजे मैने बंद किये है। पहिले मालेपर ओ(वह) दुसरे साब काम कर रहे है। ये रूम, नीचेकी खोली बंद करके बेसमेंटमें मेन स्विच बंद करना, मेन गेट बंद करो और चाबियाँ मेरेको वापस दो। मेरा घर आपको मालूम तो है। आज सुबह मुझे बुलाने आये तो थे।'' असे म्हणत त्याने गौतमला चाव्या दिल्या. तो निघूनही गेला. गौतमचे काम चालूच.

चंद्रकांत वर आला आणि, ''गौतमसाहेब, माझे खालचे सर्व काम संपले आहे, फक्त ३ सीपीयु आणिएक मॉनिटर बाकी. त्यासाठी, मॉनिटरसाठी मला तुमची मदत हवी आहे. मग उद्या करूया का?''

''नाही रे, आज सगळे संपवूया. माझे इथले झालेच आहे, तू सगळे जागेवर ठेव, दार लावून खाली ये. दिवे वगैरे बंद करायला विसरू नकोस, हं. तोवर मी तो मॉनिटर बघतो. तास-दीडतास लागेल, बरोबर? थांबशील ना?''

चंद्रकांत आवरू लागला आणि गौतम खालच्या मॉनिटरचे दुरुस्तीचे पाहू लागला.

कामातील हुशारी आणि कॉम्पुटर दुरुस्तीमधील गौतमचा हातखंडा होता. मग त्याला मॉनिटर ठीक करण्यास फार वेळ तो कसा काय लागणार? २ सीपीयुही झाले. हा चंद्रकांत वेळ का लावतो?

''काय रे इतका वेळ का?'' त्याने खालूनच ओरडून विचारले.

''मी आलोच, मी सर्व इथले आवरलेदेखील, हातपाय धुऊन वगैरेपण माझे झाले. आता दिवे स्वीच ऑफ करतो आणि दार लावून येतोच खाली,'' त्याने वरूनच आवाज दिला.

खाट- फाट! एक मोठा आवाज झाला. अचानक सारे दिवे विझले. गडद अंधार!

''साहेब, एक दिवा बंद केला. दुसरा करणार तोच तर मोठा आवाज होऊन काळोख झाला. फ्युज उडाला असावा,'' वरूनच चंद्रकांत ओरडून बोलत होता, ''तुम्ही फ्युज तेवढे बघा.''

''होय, मी खाली बेसमेंटला जाऊन फ्युजचे पाहातो. तू सारे स्वीचीस व दार लावून खाली पहिल्या माळ्यावर ये. तुझ्या बॅगमधून टॉर्च घेतो. मी फ्युझचे बघतो. शेवटचा सीपीयुपण होत आलाय. एक-दोन वायर जोडल्या की झाले.''

गौतम हातात टॉर्च घेऊन बेसमेंट मध्ये गेला. टॉर्चचा प्रकाश चांगला पडत होता. फ्युज बॉक्स उघडले. होय फ्युज उडाला आहे! त्याने हवी तेवढी फ्युज वायर कापली. टेस्टरने स्क्रू ढिले केले. अरे हे काय! टॉर्च बंद का झाला? काय होते हे कळतच नाही मला. तो वॉचमन काय म्हणत होता, बरे? गौतमच्या मनात भलतेसलते विचार येऊ लागले.

इतक्यात मेणबत्तीचा प्रकाश पडला. प्रकाशाचे किरण नेमके फ्युज बॉक्सवर पडत होते. चंद्रकांत गौतमपेक्षा फार बुटका, मग त्याला आपले हात फार उंच केल्यामुळे मेणबत्तीचा प्रकाश फ्युज बॉक्सवर पडण्यास शक्य झाले असावे. तरी इतका उंचावरून प्रकाश झोत?

''थँक्यू, मेणबत्ती आणल्याबद्दल. पण तुला ही सापडली कुठे? तुझ्या भाषेत 'भेटली' कोठे? अरे, हसलास नाहीस?''

त्याने वळून पाठीमागे पाहिले. हे काय! हा बेटा मेणबत्ती समोरील भिंतीवरील एका फळीवर ठेऊन परत वर गेला असे वाटते. असो! असा विचार करून गौतमने फ्युज जोडला. लाईट लागले. त्याने फुंक मारून मेणबत्ती विझवली. फ्युज बॉक्स बंद केले. टॉर्च लावून पहिला. चालू तर आहे. मगाशी काय झाले होते ह्या टॉर्चला, कोण जाणे? खोलीतील साफसफाई करून गौतम फ्यूज रूमचे दिवे बंद करावे असा विचार करतच होता आणि चंद्रकांत त्याला म्हणाला, ''साहेब, तुम्ही सर्व वायरी जोडल्या होत्या. मी काहीच केले नाही. सारे कॉम्पुटर्स व्यवस्थित चालतात. मी सगळी बटणे बंद केली होती, लाईट आले. सर्व चालू कसे झाले?''

''मला एक सांग, तू मेणबत्ती कोठून आणलीस? आणि ती ह्या फळीवर ठेऊन वर कधी गेलास हे मला कळलेदेखील नाही.''

''कोणती मेणबत्ती? मी आणली कधी? मी तर वरच होतो. हा आता तर मी खाली येतोय. कोठे आहे मेणबत्ती?''

''मी तू घेऊन आलास ते बघितले. तुझ्या हातात होती ती. तू मला नीटसा दिसला नाहीस. पण तुझे हात आणि हातातील ती मेणबत्ती अगदी स्पष्ट दिसली.''

''अहो, पण ती मेणबत्ती आहे कोठे?''

''अरे, ही काय ह्या फळीवर.''

मेणबत्ती तर रॅकवर नव्हतीच. पण भिंत पार मोकळी, अगदी वरपासून खालपर्यंत, त्यावर एकही फळी काय साधा खिळादेखील ठोकलेला दिसत नव्हता.

घाईघाईने सारे आटपून त्यांनी तेथून पळ काढला. ठेक्याची मुदत संपेस्तोवर त्या कंपनीचे काम पहिले. पण सायंकाळी चारपर्यंतच काम करीत. पुढे कॉन्ट्रॅक्ट रिन्यू मात्र केले नाही. आज ती कंपनी अस्तित्वात नाही, किंवा ती सहा मजली इमारत. त्याजागी येत असलेल्या मॉलचे बांधकाम चालू आहे.

मी त्याला विचारले, ''काय रे गौतम, होणाऱ्या मॉलचे कॉम्पुटर सर्विसिंग कंत्राट घेशील का?''

''नाहीरे बाबा! मी त्या बालेवाडीपासून चार पावले दूरच राहीन!''

*

## पाठारे प्रभु महिला समाज

पाठारे प्रभु महिला समाजाची वार्षिक सर्वसाधारण सभा रविवार दिनांक २८ ऑगस्ट, २०१६ रोजी पाठारे प्रभु सोसायटीच्या सांस्कृतिक केंद्राचे सभागृह, गायत्री मंदिराशेजारी, १२वा रस्ता, प्रभुनगर, खार (प.), मुंबई-४०००५२ येथे दुपारी ठीक ४ वाजता समाजाच्या अध्यक्षा सौ. नीता मिलिंद सेंजित यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित करण्यात आली आहे. तरी सर्व सभासद भगिनींनी बहुसंख्येने सहभागी व्हावे ही विनंती.

त्याच दिवशी पुढील स्पर्धा घेण्यात येतील. (या स्पर्धा फक्त महिला सभासदांसाठी आहेत.) भाग घेणाऱ्या स्पर्धकांनी दुपारी ठीक ३.३० वाजता उपस्थित रहावे.

१) निबंध स्पर्धा- महिलांसाठी
   विषय: माझी अविस्मरणीय सहल
   मुलींसाठी (१५ वर्षांखालील)
   विषय: माझी अविस्मरणीय सहल (मराठी)

सूचना- शब्दमर्यादा ६०० शब्द. निबंध घरून सुवाच्य अक्षरात परिच्छेद पाडून व कागदाच्या फक्त एका बाजूस लिहून आणणे, तसेच निबंधाच्या कागदावर कोठेही आपले नाव लिहू नये.

२) काव्य स्पर्धा- महिलांसाठी
   विषय: पुनवेची रात

सूचना- काव्य घरून लिहून आणणे. सुवाच्य अक्षरात कमीत कमी तीन कडव्यात असावे. तसेच काव्याच्या कागदावर कोठेही आपले नाव लिहू नये.

३) संगीत स्पर्धा- महिलांसाठी
   विषय: गजानन वाटवे यांचे भावगीत.
   मुलींसाठी (१५ वर्षांखालील)
   विषय: पावसाचे गीत.

४) नृत्यस्पर्धा
   विषय: रेकॉर्ड डान्स. वेळ- ३ ते ५ मिनिटे (कॅसेट प्लेअरची व्यवस्था उपलब्ध)
   मुली: ५ ते ९ वर्षे, १० ते १५ वर्षे
   मुले: ५ ते ९ वर्षे, १० ते १५ वर्षे
   महिला: १६ ते २५ वर्षे, २६ ते ४० वर्षे, ४० वर्षांवरील.

उत्कृष्ट नृत्याविष्कार व नृत्यदिग्दर्शकालाही पारितोषिक देण्यात येईल.

अधिक माहितीसाठी पुढील व्यक्तीशी संपर्क साधावा:

सौ. नीता सेंजित: ९८२०१६६६२८
सौ. पल्लवी कोठारे: ९८६७६६४७८९, २६०४९१५९
सौ. नूतन कीर्तिकर: ९६१९१६८१३१, २६०४९१५९
सौ. रश्मा विजयकर: ९८२०९८१८८२, २२०१३८८३

*

# असा हा संसार

**-प्रणिता प्रभाकर**

संसार, कुटुंब, आजी-आजोबा, आई-वडील, सासू-सासरे, मुले-नातवंडे हे सर्व विषय रोजच्या दैनंदिनीतील आहेत. ह्या विषयाला अनुसरून काहीही लिहिणे म्हणजे सर्वांच्या कपाळाला आठ्या पडतात. कारण सोपे आहे, रोज मरे त्याला कोण रडे.... म्हणजे असे की, दररोजच्या कटकटी पेपरमध्ये काय त्या वाचायच्या?

काहीतरी मनोरंजनात्मक असेल तर तेवढा वेळही जातो आणि मनालाही बरे वाटते. परंतु जोपर्यंत आपण वाचत नाही; तोपर्यंत आपल्याला ते कळते पण वळत नाही.म्हणून थोडक्यात हा प्रपंच.

आजच्या एकविसाव्या शतकात, कुटुंब ही संस्था न वाटता एक निवाऱ्याचे साधन वाटत आहे. कारण त्याला आजची जीवनपद्धती होय. आजचे जीवन इतके झपाट्याने चालले आहे की व्यक्तीला विचार करायलाही वेळ मिळत नाही. आमच्या पिढीला मागे सारून पुढची पिढी तयार झालीच आहे,परंतु त्या पिढीचे जीवनमान पाहिले तर आपल्या छातीत धस्स झाल्यासारखे वाटते. ह्याला कारण त्यांची नोकरी निमित्ताने चाललेली धावपळ होय. आपल्या पिढीनेही नोकरी-व्यवसाय केले. परंतु त्याला वेळेची मर्यादा होती; तसेच राहणीमानही चाकोरीबद्ध होते. ही मर्यादा आणि चाकोरी तोडून आजची पिढी बाहेर पडली आहे... नव्या वाटा शोधण्यासाठी आणि जीवनाचे उदात्तीकरण करण्यासाठी. त्यांना आपले एक स्वतंत्र व्यक्तिमत्त्व तयार करावयाचे असते व आयुष्यात स्वत:साठी जागा तयार करायची असते. त्याचसाठी हा सर्व अट्टहास.

पूर्वी ९ ते ५ची नोकरी केली की संध्याकाळी माणसे घरी येत. आता तसे नाही. घरची संध्याकाळ कशी असते ते ह्या पिढीला माहीतच नाही; कारण घरी परतण्याची वेळच माहीत नसते त्यांना. तेव्हा लग्न करताना जोडीदार शोधतानाही आपल्या नोकरी व्यवसायाशी मिळतेजुळते घेणारा असावा किंवा असावी असे वाटते. ज्याला आपण इंग्रजीत 'Career Oriented' म्हणू शकतो. आज जागतिकीकरण झाल्याने ह्या पिढीला जोडीदार शोधणे म्हणजे खूप मोठे काम आहेसे वाटते. आजकाल बऱ्याच विवाहसंस्था निघाल्या आहेत. तसेच डॉटकॉमसाईट आहेतच. त्यामुळे ओळखीतून विवाह जमण्याचे दिवस आता गेले. एकतर जोडीदार त्याच ऑफिसातील असावा किंवा विवाहसंस्थेतील आपल्या अटीस योग्य असाच असावा. जर स्वत:ने जोडीदार शोधला तर तो परधर्मीय असू शकतो. त्यामुळे आईवडिलांना आपल्या विचारांना मुरड घालावी लागते किंवा मन मोठे करावे लागते.

आजची परिस्थिती अशी आहे की प्रत्येक दहा विवाहापैकी दोनच विवाह सफल होताना दिसतात. थोडक्यात म्हणजे घटस्फोटाची बातमी ऐकून नवल वाटत नाही; उलटपक्षी विवाह टिकून राहिला तरच नवल वाटते. आजच्या पिढीची विवाहविषयी मते वेगळी झाली आहेत. त्यांना वैवाहिक जीवनापेक्षा दोघांच्या वैयक्तिक जीवनाचे महत्त्व जास्त वाटू लागले आहे. ज्याला आपण इंग्रजीत `Individually Oriented' म्हणू शकतो. असे केल्याने दोन पिढीतील अंतर तर वाढतच जाते त्याशिवाय तणाव निर्माण होतात. मग शेवटी आपलेच दात आणि आपलेच ओठ अशी परिस्थिती निर्माण झाल्याने आपण वडीलधारी या नात्याने मूग गिळून गप्प बसावे लागते. त्याशिवाय ह्या मुलांना कामाचा ताण खूपच असतो. अहोरात्र त्यांना कामाशिवाय दुसरे काहीच दिसत नाही किंबहुना इच्छा असूनही तसे करू शकत नाहीत. कारण त्यांना सुरुवातच पाच आकडी पगाराची झाल्याने त्यांच्याकडून कामाची अपेक्षाही तितकीच असते. पर्यायाने मानसिक ताण वाढलेला असतो आणि मग चिडचिड, वैताग, अबोला इत्यादी गोष्टी घर करू लागतात. इथे दोघेही एकमेकांना समजून घेण्याचा प्रयत्नच करत नसल्याने तणावाची परिसीमा गाठली जाते. त्याचे कारण म्हणजे वैवाहिक जीवनात वैयक्तिक जीवनाला दिलेले अनन्यसाधारण महत्त्व होय आणि मग घटस्फोटापर्यंत पाळी येते.

ह्या कारणामुळे अनेक जोडप्यांना ताबडतोब मुलांचे लोढणे नको वाटते. पहिल्यांदा जोडप्यांना एकमेकाची पूर्ण ओळख होण्यासच अवधी लागतो आणि पूर्ण ओळख झाल्यानंतरच ते दोघे मुलांचा विचार करू लागतात. तोपर्यंत वयही उलटून गेलेले असते. आजमितीस कमीतकमी व्यावसायिक शिक्षण घेणे जरुरीचे आहे आणि त्यानंतर मुले पदव्युत्तर शिक्षण घेण्याच्या मागे असतात तेव्हा कुठे त्यांना लठ्ठ पगाराची नोकरी मिळते. हे करण्यात मुलींचे वय २५ पर्यंत जाते. हे सर्व विचारात घेता कुटुंब नियोजनाचा विचार करेपर्यंत फारच उशीर होऊ शकतो. म्हणून शक्यतो कुटुंबनियोजनाच्या भानगडीतच पडत नाहीत आणि एकावरच गप्प बसतात किंवा समाधान मानतात. 'आम्ही दोघे राजाराणी' असे दिवस असल्याने त्यांच्यात तिसरा आला तर मग त्या तिसऱ्याला पाहायचे कुणी? तेव्हा मग सासूसासरे किंवा आईवडील आठवतात. नाहीतर मग पाळणाघर मदतीला आहेच.

आणि हो! आजच्या जमान्यात मुलींचे वय मुलांपेक्षा मोठेही असू शकते. हे सर्व बदल समाजाने स्वीकारले तरीही निसर्ग कोणालाही आपल्यावर कुरघोडी करू देत नाही, म्हणजे असे की जोडप्यात मुलीचे वय मुलापेक्षा मोठे असले आणि संसाराला सुरुवात जर उशीरा केली तर मग प्रजननक्रियेत अडथळा येण्याची शक्यता असू शकते. म्हणून आजचे संसार हे राजाराणीचे संसार आहेत. असे होऊ नये म्हणून निसर्गनियमाला धरूनच माणसाने चालले पाहिजे. इथे गम्मत म्हणून नमूद करावेसे वाटते की, मुलांच्या ह्या निर्णयाने आपोआपच लोकसंख्येवर योग्य तो परिणाम होईल. अर्थातच लोकसंख्येवर नियंत्रण आल्यावर जगरहाटीची सर्व चक्रे नियमितपणे चालू शकतील. बेकारी जाऊन वाईट गोष्टींवर नियंत्रण येईल. तसेच लोकांना वेगवेगळ्या नोकऱ्याही मिळू शकतील.

मागे नमूद केल्याप्रमाणे आज पाळणाघरे आहेतच. परंतु एक नवीन व्यवसाय उदयोन्मुख झाला आहे आणि तो म्हणजे 'र्ल्ज्ञे'. हा तसा नवा शब्द नाही. काही दिवसांपूर्वी इंग्रजी वर्तमानपत्राच्या पुरवणीत वाचनात आला. ह्याचा इंग्रजीत अर्थ होतो 'रदग्ह ल्ज' किंवा 'ैदेदस' म्हणजे मराठीत अनुवाद करायचा झालाच तर संगतीने काम करणारे किंवा एकत्र काम करणारे असे म्हणू शकतो. पूर्वी इंग्लिश लोक मुलांच्या देखभालीसाठी आणि शिक्षणासाठी घरी 'र्हैहहब' ठेवत व ती त्यांच्या घरीच राही. त्याचप्रमाणे आजच्या जोडप्यांना मुलांच्या संगोपनाचा प्रश्न येत असेल तर मग त्यांना पाळणाघराची वाट न धरताही नवीन आजी घरात ठेवू शकतील, जी मुलांवर संस्कार करू शकेल तसेच त्यांना अभ्यासातही मदत करू शकेल. परंतु हे करताना ह्या जोडप्याने त्या नवीन आजीला आपल्या कुटुंबाचा एक अविभाज्य घटक म्हणून मानले पाहिजे. ह्या कामासाठी आजीचीच गरज हवी असे नाही; परंतु ती व्यक्ती सुशिक्षित आणि सुसंस्कृत असावी. त्यासाठी मात्र पैसे मोजायची तयारी असावी लागते. ह्यावर मला असे सांगावेसे वाटते की, घरात हक्काची आजी आणि आजोबा असताना विकतची आजी आणण्याचे कारण काय? ह्यावर अनेक मतांतरे आहेत. ती अशी... काहीना घरात वयस्कर व्यक्तींचा गोंधळ वाटतो, तर काहींना त्यांचे लोढणे वाटते. उलटपक्षी काही वयस्कर व्यक्तींना नातवंडांची जबाबदारी बंधनकारक वाटते. त्यांना आपले स्वातंत्र्य हिरावून घेतल्यासारखे वाटते. ह्या कारणास्तव ऑपेरची कल्पना अस्तित्वात आली. पूर्वी आपल्याकडे मुलांना सांभाळण्यासाठी दाई असायची. ती फक्त मुलांचे पालनपोषण करी. परंतु आजची ऑपेर सुसंस्कृत आणि सुशिक्षित असल्याने मुलांवर चांगले संस्कारच नव्हे तर वेळोवेळी चांगल्या गोष्टींची माहिती देऊन, त्यांच्यातील सुप्त गुणांची जोपासना कशी करायची हे देखील तिला माहीत असते. तेसुद्धा घरात राहून करते म्हणजे आपल्या डोळ्यादेखत ह्या सर्व गोष्टी होत असतात. त्यामुळे काळजी करायचे काही कारण नाही. आणि हो, ह्या ऑपेरना कुटुंबातील व्यक्ती म्हणूनच मानायला हवे. जिथेजिथे तुमचे कुटुंब तिथेतिथे ह्या ऑपेर होय. ही ऑपेरची संकल्पना नवीनच असल्याकारणाने त्यांच्या ब्युरोचा सुळसुळाट झालेला नाही, किंबहुना ही संकल्पना पैसेवाल्यांसाठी असल्याकारणाने उच्चमध्यमवर्गात त्याचे स्थान निर्माण होण्यास अजून अवधी लागेल. माझ्या मते पैसेवाल्यांच्या मुलांना ऑपेरची जास्त गरज आहे कारण ह्या मुलांच्या हातात पैसा खुळखुळत असल्याकारणाने आणि बाहेर अनेक प्रलोभने असल्याने त्यांना विचार न करता सर्व गोष्टी साधता येतात. कालांतराने ही बाब त्यांच्या आईवडिलांच्या ध्यानात आली आणि म्हणून ऑपेर अस्तित्वात आली. जेणे- करून मुलांना योग्य मार्गदर्शन आणि विविध छंदांची माहिती करून देईल तसेच पैशाचा अपव्यय होणार नाही.

आता उच्च मध्यमवर्गातील माणसे आपल्या मुलांकडे वेळेअभावी पूर्णपणे लक्ष देऊ शकत नाहीत तसेच घरात इतर कोणीही किंवा वडीलमाणसे नसल्यानेही ऑपेरची संकल्पना योग्य रीतीने उपयोगी पडेल!!!

(टीप: २०११ मधील महाराष्ट्र टाइम्समध्ये हा लेख प्रकाशित झाला होता. कृपया याची नोंद घ्यावी. लेखिका समुपदेशक आहेत.)

## माझी बहीण

**-शीला (उषा) सुरेश कीर्तिकर**

लता त्रिलोकेकर! पूर्वाश्रमीची लता विजयकर. रामराव विजयकरांचे हे शेंडेफळ! अतिशय टापटीपेची भोक्ती. अक्षर रेखीव आणि सुंदर! माणसांची हावरी, चारचौघांत मिसळण्याची आवड. नाजूक, रेखीव व्यक्तिमत्त्व! एलफिन्स्टन कॉलेजच्या शतक महोत्सवात तिने 'भूमीकन्या सीता' मधील उर्मिलेचे काम केले होते! नभोवाणीवरील श्रुतिकेत ती अनेकदा असायची. तिचे पती बोटीवर कॅप्टन. त्यामुळे हिचा जगभर प्रवास. सिंगापूर, मस्कत, अमेरिका... अशा ठिकठिकाणी ती फिरली आणि रमलीपण. कुणालाही मदत करण्याची तिची धडपड! साहित्याची आवड अन् मराठीवर प्रभुत्व. त्यामुळे कुठल्याही मराठी मंडळात ही सक्रीय सामील! पुण्याला असताना जयंतराव टिळकांच्या हाताखाली काम केलेले. तिच्या कितीतरी आठवणी आज मनात फेर धरताहेत. नातीला मोठे करण्यात तिने घेतलेले परिश्रम..., 'पु. लं' आदी साहित्यिकांच्या समवेत तिच्या घरी झडलेले भोजनादी कार्यक्रम... तिचे माणसात रमणे...

लता आता माझ्या मनात आठवणींचा ताल धरते आहे....

## प्रभु तरुण आश्रयदाते

१) सौ. विमल व श्री. माधव नायक,
२) सौ. नलिनी व श्री. रविंद्र रामराव मानकर,
३) सौ. अनामिका बी. ए. एल.एल.बी.
४) कै. नटवर्य नारायण रामराव झावबा
५) कै. सॉ. मोतिराम विनायक जयकर
६) आद्य संपादक कै. विष्णु कृष्ण कोठारे
७) कै. रावसाहेब चंद्रकांत बालमुकुंद वेलकर
८) कै. सौ. सुशीला यशवंतराव कीर्तीकर
कै. सौ. सुशीला व श्री. मोरेश्वर वि. प्रधान
९) सौ. मीरा व श्री. रविंद्र नानूजी दळवी
१०) कै. सौ. शलाका (अरुणप्रभा) शैलकुमार श्रीकृष्णनाथ दळवी
११) कै. श्रीमती चंपुबाई आणि
कै. आनंदराव सुंदरजी धराधर
१२) कै. सौ. रोहिणी (रत्नप्रभा) श्रीकर राणे
१३) सौ. निलीमा व श्री. सूजन केशवराव राणे
१४) कै.श्रीमती रोझाबाई आणि कै. बाळाराम केरोबा नायक
१५) कै. शरद विनायक कीर्तिकर यांच्या स्मरणार्थ अनामिक
१६) कै. सॉ. दिलीप रघुनंदन कोठारे
१७) कै. श्रीमती कमलजा आनंदराव अजिंक्य
१८) कै. दिवाळीबाई व कै. डॉ. वामनराव आनंदराव विजयकर
१९) कै. विष्णुराज बाळाराम नायक
२०) ॲड. सदाशिव आनंदराव धुरंधर
२१) कु. कस्तूर मोठाबाई जयकर
२२) कै. कमलिनी रमाकांत प्रधान
२३) कै. नटवर्य शरद श्रीकृष्णनाथ गणपतराव दळवी
२४) आद्य मराठी लघुलिपीकार कै. भुजंगराव रामचंद्र मानकर
२५) कै. वामन मोरेश्वर प्रभाकर
२६) कै. चंद्रकांत नारायण विजयकर,
कै. कुंजविहारी वाय. जी. तळपदे,
कै. प्रविण चंद्रकांत नारायण, विजयकर,
कै. वैभव कुंजविहारी वाय. जी. तळपदे
यांच्या स्मरणार्थ एक हितचिंतक
२७) कै. डॉ. विद्याधर चंद्रकांत नारायण विजयकर यांच्या स्मरणार्थ हितचिंतक
२८) कै. पूर्णचंद्र केशरीनाथ राव व
कै. सौ. शीला पूर्णचंद्र राव यांच्या स्मरणार्थ
२९) डॉ. राम गोविंदराव नवलकर
३०) सौ. शुभांगी राम नवलकर
३१) सौ. रीटा आणि श्री. मंदार माधवराव नायक
३२) कै. सौ. विजया व श्री. प्रकाश माधव नायक या त्यांच्या आईवडिलांच्या स्मृत्यर्थ उन्मेष प्रकाश नायक
३३) सौ. वृंदा आणि श्री. शाम विनायक जयकर
३४) कै. श्रीमती जयश्री आणि कै. श्री. जयवंत विश्वनाथ कीर्तिकर स्मृत्यर्थ श्री. उमेशचंद्र जयवंत कीर्तिकर
३५) कै. श्रीमती प्रतिमा आणि कै. श्री. धाकलेश्वर बाळाजी जयकर स्मृत्यर्थ सौ. सुप्रिया उमेश कीर्तिकर

## प्रभुतरुणास देणगी

✶ सौ. ऐश्वर्या आणि श्री. आशीष प्रमोद नवलकर यांजकडून अनुश्काच्या बारावीतील यशाप्रीत्यर्थ रु. ५००/-

## अभिनंदन

✶ श्री. वीरधवल दीपक तळपदे, डोंबिवली रोटरॅक्ट क्लबचे अध्यक्षपद भूषवीत असताना त्यांच्या संस्थेस संपूर्ण मुंबई झोनमधून उत्कृष्ट संस्थेचे पारितोषिक प्राप्त झाले. अभिनंदन.

✶ डॉ. अरुण वसंतराव जयकर यांच्या वैद्यकीय व्यवसायाला ५८ वर्षे पूर्ण झाली. 'नैतिक डॉक्टरकीची ५८ वर्षे' या शीर्षकाखाली त्यांच्यावर 'महाराष्ट्र टाइम्स'मध्ये राजेश चुरी यांनी 'डॉक्टर्स डे'च्या निमित्ताने गौरवपूर्ण, मुलाखतवजा लेख लिहिला. मानवतेला जपणाऱ्या डॉ. अरुण यांचे मन:पूर्वक अभिनंदन आणि त्यांच्या सेवाव्रताला सलाम!

## परीक्षेतील सुयश

**दहावी - एस.एस.सी.**

सोहम सुदेश देसाई ८६.४ %

ईशान दीपक कोठारे ७३ %

**बारावी - एच.एस.सी. - कॉमर्स**

कु. ईशानी श्रेयस सेंजित ९०.६२%

कु. अनुश्का आशीष नवलकर ८१.८५ टक्के ५३२ / ६५०

कु. अनुश्का ही हॉटेल मॅनेजमेंटच्या प्रवेशपरीक्षेत (जेईई २०१६) भारतातून ६७० वी आली. अभिनंदन.

कु. चैत्रा हरेश देसाई ७६ %

## पाठारे प्रभु चॅरिटीज

'पाठारे प्रभू चॅरिटीज' या संस्थेची वार्षिक सर्वसाधारण सभा दिनांक ५ जून रोजी चॅरिटीजच्या 'सुरेश विठ्ठल सभागृहात' पार पडली. चॅरिटीजचे अध्यक्ष श्री. उदय शंकर मानकर यांच्या अध्यक्षतेखाली भरलेल्या या सभेत वार्षिक अहवालास एकमताने मान्यता देण्यात आली.

## पाठारे प्रभु सोशल समाज

पाठारे प्रभु सोशल समाजाची 'वर्षा सहल' रविवार दिनांक २४ जुलै २०१६ रोजी मनोरी येथील 'किणी'ज रिसॉर्ट येथे नेण्यात येईल. प्रत्येकी शुल्क रु. १०००/-. अधिक माहितीसाठी चिटणीसांकडे संपर्क साधावा.
सौ. नीता सेंजित: ९८२०१६६६२८
श्री. जयंत कीर्तिकर: ९८६७९५८५३५

**वार्षिक सर्वसाधारण सभेची अधिसूचना:**

पाठारे प्रभु सोशल समाजाची वार्षिक सर्वसाधारण सभा रविवार दिनांक २१ ऑगस्ट, २०१६ रोजी प्रभु सेमिनरी शाळा सभागृह, भाई जीवनजी लेन, ठाकुरद्वार, मुंबई-४००००२ येथे सायंकाळी ५ वाजता समाजाध्यक्षा श्रीमती स्वाती प्रविण राणे यांच्या अध्यक्षतेखाली घेण्यात येईल. सर्व सभासदांनी उपस्थित राहावे, ही विनंती.

**सभेपुढील कामकाज**

१) सूचना परिपत्रकाचे वाचन.

२) समाजाच्या रविवार दि. २३ ऑगस्ट २०१५ रोजी झालेल्या वार्षिक सर्वसाधारण सभेची टिपणे वाचून मंजूर करणे.

३) समाजाचा १ एप्रिल २०१५ ते ३१ मार्च २०१६ चा कार्यवृत्तांत अहवाल वाचून मंजूर करणे.

४) समाजाच्या कार्यकारिणीचा १ एप्रिल २०१५ ते ३१ मार्च २०१६ सालाचा जमाखर्चाचा ताळेबंद सादर करणे व मंजूर करून घेणे.

५) अध्यक्षांच्या परवानगीने आयत्यावेळेचे कामकाज.

**विशेष सूचना-**

१) गणसंख्येच्या अभावी सभा तहकूब झाल्यास तीच सभा, त्याच ठिकाणी, त्याच दिवशी आधी ठरलेल्या वेळेच्या अर्ध्या तासानंतर (म्हणजे ५.३० वाजता) घेण्यात येईल. त्यावेळी गणसंख्येचे बंधन राहणार नाही.

२) समाजाचा अहवाल व जमाखर्चाचा ताळेबंद याविषयी ज्या सभासदांना काही प्रश्न विचारावयाचे असतील त्यांनी ते लेखी स्वरूपात समाजाचे सं. चिटणीस श्री. जयंत कीर्तिकर, चंद्रकला, ३रा मजला, डिलीव्हरी पोस्ट ऑफिससमोर, ७वा रस्ता, खार(प.) मुंबई ४०००५२ येथे शुक्रवार दि. १३ ऑगस्ट २०१६ पर्यंत पाठवावेत.

✳

## प्रभुतरुणाची डायरी

### मरण

| | | | |
|---|---|---|---|
| ३-६-१६ | श्रीमती अनुराधा (कालिंदी) श्यामराव तळपदे, | वय ८६, | दादर |
| ६-६-१६ | श्री. माधवराव केशवराव राव, | वय ९१, | अंधेरी |
| ७-६-१६ | श्री. ललित कुंजविहारी धैर्यवान, | वय ८०, | पुणे |
| ८-६-१६ | डॉ. श्रीमती सुनील अरविंद राणे, | वय ७६, | धसवाडी, गिरगाव |
| ९-६-१६ | श्री. श्रीपाद काळूराम विजयकर, | वय ८७, | नवरोजी स्ट्रीट, गिरगाव |

## THE PATHARE PRRABHU CHARITIES

### Award of Educational Merit Prizes For the Year 2016

The Pathare Prabhu Charities have been awarding Educational Merit Prizes every year to students of our community passing various examinations with merit.

Students passing any examination SSC/CBSE/ICSE/IGCSE onward from recognized university/educational institution during this year are earnestly requested to submit the photocopies of their mark sheets in the office of the Pathare Prabhu Charities, Thakurdwar, between 11.00 a.m. and 5.00 p.m. after the result of the examination is declared but not later than **September 16, 2016** to enable the trustees to award the prizes to the eligible students. The students and parents concerned should note that the merit prizes will be awarded by the Trust only on the basis of the results/mark sheets received by the Trust before the dead line.

This year the Annual Eductional Merit Prize Award Function will be held on **Sunday, 27 November, 2016** at M.V.M. Degree College of Commerce & Science, Mogaveera Bhavan, MVM Educational Campus Marg, off Veera Desai Marg, Andheri West, Mumbai-400058.

Students are requested to furnish the following requirements along with the examination results/marks sheet.

1. Full Name of the Student (Married Female to give maiden name also)
2. Latest coloured photo of the student, postcard size with light background.
3. Full Postal Residential Address.
4. Telephone no.
5. Email adress if available.
6. Confirmation regarding student having bank account: Yes/No
7. Name of the Grandfather
8. Bio data in brief (past racord of academic career)
9. Confirmation whether the student will receive the prize if awarded, by his personal attendence at the function on the aforesaid date

Chief Guest : **Dr. Bhalchandra Madhav Jayakar,**
MCh(ped.Surg), MS(Gen. Surg), DNB,
PGDHA, Neonatal & Pediatric Surgeon
**Dr. Mrs. Priti Bhalchandra Jayakar,**
MS, FCPH(Gold)-Surgery, DNB
Fellow HFH Onco-Surgery (Tata Mem. Hosp)
PGDHA, PG Dip. in Medico-Legal Systems,
Masters in Medico-Legal Precice.

For the Board of Trustees
The P. P. Charities
**Uday S. Mankar**

हे मासिक मुद्रक, प्रकाशक श्रीमती सुहासिनी कीर्तिकर यांनी मालक बोर्ड ऑफ कंट्रोल प्रभुतरुण करिता मे. स्नेहेश प्रिंटर्स, ३२०-अ, शाह अँड नाहर इंडस्ट्रीयल इस्टेट, अ-१, धनराज मिल कंपाऊंड, सीताराम जाधव मार्ग, लोअर परेल, मुंबई-४०००१३ येथे छापून पारिजात बी-३, युनियन बँक एम्प्लॉईज को-ऑप. हौ. सोसायटी, पटेल इस्टेट, जोगेश्वरी (प.), मुंबई-४००१०२ येथे प्रकाशित केले.

संपादक: श्रीमती सुहासिनी कीर्तिकर RNI NO. 14613/67